स.क्रि. के.नं. २७/२०२६

Exh.5/C

मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो, कागल

यांचे कोर्टात. . .

श्री. पांडूरंग कृष्णा पाटील - फिर्यादी

Order
--------
Before me

विरुद्ध

श्री. विलास श्रीपती चौगले, वगैरे - आरोपी

J.M.F.C
30.06.2026

यातील फिर्यादी यांचे फिर्यादीचे कामी व्हेरिफिकेशन

## व्हेरिफिकेशन

**मी फिर्यादी श्री. पांडूरंग कृष्णा पाटील, वय ७० वर्षे, धंदा- शेती, रा. कुरुकली, ता. कागल, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर शपथपत्र करतो की,**

१) मी वरील पत्यावरचा कायमचा रहिवाशी असून मजकूर गावी माझी शेत जमिन व राहते घर असून सदर ठिकाणी मी माझ्या कुटूंबासह राहतो. आरोपी नं. २ चा आरोपी नं. १ चा नातेवाईक आहे. आरोपी नं. ३ हा मुलगा आहे. सर्व एकमेकांचे विचाराने वागत असून ते गावगुंड आहेत. आरोपी नं. २ हा वैद्यकिय

Asstt. Supdt.

व्यवसाय करतो. त्याने या वैद्यकिय व्यवसायामध्ये अमाप पैसा मिळविला असून त्या पैशाच्या जोरावर आरोपी नं. १ च्या मदतीने मला व माझ्या कुटूंबाला त्रास देत असतो.

२) मला आरोपी नं. २ चे मयत वडिल विठ्ठल कृष्णा पाटील यांनी यापुर्वी मला व माझ्या कुटूंबियांना शेत जमिनीच्या हद्दीवरुन त्रास व पिकाचे नुकसान केले आहे. त्यामुळे माझे व आरोपीचे बोलणे नाही. तसेच आरोपी नं. २ चे वडिल यांनी जमिनीच्या वाटपावरुन व घरांना चुकीच्या नोंदी केल्या बाबत मी त्यांच्या विरुद्ध मे. दिवाणी कोर्ट कागल यांचे कोर्टात रे.क.नं. २९/२०१६ चा दावा दाखल केला आहे. तो दावा गावपातळीवर भविष्यात वादविवाद होवू नये म्हणून आपसातीने मिटविला. तरी देखील आरोपी नं. २ व त्यांच्या कुटूंबियांनी आपल्या स्वभावात बदल केला नाही.

३) मौजे कुरुकली ता. कागल येथे माझा गट नं. ४१६ व ४२२ हा आहे. या मिळकतीमध्ये मी चालुसाठी ऊस केला होता. माझ्या मिळकतीस लागून आरोपी नं. २ ची वडिलोपार्जीत शेत जमिन आहे. तेव्हा आरोपी नं. २ हा इतरांच्या मदतीने हद्दीच्या खुना उपटणे, पिकाचे नुकसान करणे असे प्रकार करत राहिले. तसेच कारखान्यास ऊस पाठविताना ऊस तोडण मजुरांनाही ऊस तोडणी करणेस मजुरांसह मुकादम यांना दमदाटी केली. मी दि. १०/०२/२०२६ इ. रोजी वर नमुद केलेल्या शेत जमिनीमध्ये असलेला ऊस तोडणीसाठी मुकादम यांना सांगत असताना त्यांनी ऊस तोड करणेस नाकारले. मी दिनांक १२/०२/२०२६ इ. रोजी भावेश्वरी दुध डेअर कुरुकली येथे दुध घालणेसाठी गेलो असता मला आरोपी नं. १ व २ भेटले. त्यावेळी मी त्यांना मुकादम यांना माझा ऊस का तोडू नका असे सांगितले बाबत विचारले असता, तु कोण विचारणारा असे बोलून

Asstt. Supdt.

माझ्याशी झोंबाझोंबी करुन माझ्या हातातील दुधाची किटली रस्त्यावर फेकली व त्यामुळे माझे दोन लिटर दुधाचे नुकसान झाले. त्यावेळी आरोपी नं. ३ ही तेथे पळत येवून त्यानेही मला धक्काबुक्की करुन खाली पाडले. त्यावेळी दुध घालाय येणारे व गावातील इतर लोक जमा झाले व त्यांनी मला सोडवून घेतले. या आरोपींच्या मारहानीमध्ये मला किरकोळ जखमा झाल्या त्याबाबत मी आरोपींच्या विरोधात पोलीस ठाणा मुरगुड येथे तक्रार दाखल केली परंतु त्यांनी माझी कोणतीही दखल घेतली नाही.

४) वरील आरोपी यांनी पुर्वीचा राग मनात धरुन दि. १९/०२/२०२६ इ. रोजी माझे पाईप लाईनचे नुकसान करणेसाठी जेसीबीच्या सहाय्याने पाईप लाईन फोटून काढली. अशा पद्धतीने आरोपी या ना त्या निमित्ताने आरोपी त्रास देत आहेत. तेव्हा आरोपींनी केलेल्या कृत्याबाबत त्यांना जास्तीत जास्त शिक्षा व्हावी अशी माझी विनंती असून त्याकरिता मी फिर्याद दाखल केली आहे.

--------------------

म्हणून केले व्हेरिफिकेशन असे आज मुक्काम गारगोटी

दिनांक १० /०४/२०२५ मे. जा. व्हावे

गारगोटी,

पांडुरंग [signature]

मी ॲफिडेव्हिट करणार यास ओळखतो

[signature]

**(ॲड. एस. बी. पाटील)**

[signature] 10/4/25

**Asstt. Supdt.**

## प्रतिज्ञा

मी ॲफिडेव्हिट करणार सत्य प्रतिज्ञा करतो की, वर नमुद व्हेरिफिकेशन मधील सर्व मजकूर माझे स्वत:चे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुक्काम गारगोटी दिनांक १० /०४/२०२५

पांडुरंग कृष्णा पाटील

Solemnly Affirmed before me by
Shri. Pandurang krishna Patil a/o 70
of R/o. Kurukali Tal. Kagal Dist Kolhapur
who is identified by
Shri. Adv S. B. Patil
whom I know personally
Date- 10/4/25

Asstt. Supdt.
Gargoti

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.30 14:58:53 +0530